# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-202

# बाळासाहेब देसाई महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

▲पाटण, दि. १३ : कोयना एज्युकेशन सोसायटी बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटणचा शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ चा आय. क्यू. ए. सी. फेस्टिवल, वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम गुरुवार, दि. १५ व शुक्रवार, दि. १६ रोजी सकाळी ११ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात होत असल्याची माहिती बाळासाहेब देसाई कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी दिली.

गुरुवार, दि १५ रोजी आय. क्यू. ए. सी फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर आणि संचालक संजीव चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी ग्रंथ प्रदर्शन, कला मंच, रांगोळी व मेहंदी स्पर्धा, फोटोग्राफी प्रदर्शन अशा स्पर्धांचे आयोजन सोबतच फूड फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार, दि. १६ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रामदास माने, चेअरमन, एमडी माने ग्रुप ऑफ कंपनी, पुणे हे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास डॉ. सुहास देशमुख व संजीव चव्हाण तसेच श्रीमंत याज्ञसेन पाटणकर, कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, प्रतिष्ठित नागरिक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी केले आहे.

दैनिक -ऐक्य
दिनांक -14/02/2024
वार बुधवार